REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# "ग्रामीण साहित्य आणि समाज"

**प्रा. डॉ. पी. आर. जाधव**
**मराठी विभागप्रमुख, स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय**
**नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.**


## प्रस्तावना :-

भारताची लोकसंख्या आज एकशे चाळीस कोटी झालेली आहे. या एकशे चाळीस कोटी माणसाचा पोशिंदा म्हणजे आपला शेतकरी वर्ग आहे. अलीकडच्या काळात शहरीकरणाचा वेग वाढलेला असला तरी अजूनही साठ, पासष्ट टक्के भारतीय जनता ग्रामीण भागात राहते आणि प्रामुख्याने शेती हेच त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. कृषी केंद्रित ग्रामीण समाजाचे शतकाच्या उंबरठ्यावरील 2001 नंतरचे वास्तव काय आहे? हे ग्रामीण साहित्यातून यथातथ्यपणे व्यक्त झाले आहे काय? ग्रामीण साहित्य ही ग्रामीण वास्तवाची एक प्रतिकृती आहे की, त्यामागे लेखकाचा ग्रामीण साहित्याचा मूल्यव्यूह आहे, परिवर्तनाची दृष्टी आहे? या सर्व प्रश्नांचा संक्षेपाने प्रस्तुत शोधनिबंधात विचार करावयाचा आहे.

कोणताही समाज हा सदोदित एका स्थितीत नसतो, तरी काळानुसार होत जाणाऱ्या बदलांना फारसे महत्त्व कारण एकंदर समाज व्यवस्थेच्यादृष्टीने हे बदल महत्त्वाचे नसतात. महाराष्ट्रातपुरते पाहिल्यास पेशवाई असेपर्यंत आपल्या समाज व्यवस्थेत मूलगामी, सर्वंकष बदल होऊ शकले नाहीत. इंग्रजी राज्याची स्थापना झाल्यानंतर आपल्या समाजाची मध्ययुगातून आधुनिक युगाकडे वाटचाल सुरू झाली. एकोणिसाव्या शतकात प्रबोधनाची पहाट आपल्याकडे आली असे आपण म्हणतो. परंतु दुर्दैवाने मुंबई- पुणे परिसरात घडून आलेले हे प्रबोधन मात्र ग्रामीण समाजापर्यंत त्या काळात पोहोचले नाही.

## मध्ययुगीन ग्रामीण भारत

सबंध मध्ययुगात सामूहिक जीवनाचा मूलभूत घटक गाव होते. नगरे फारच थोडी होती, ग्रामसंस्था आणि जातीसंस्था ग्रामीण



समाजाच्या लौकिक व्यवहारांचे नियंत्रण करणाऱ्या संस्था होत्या. निरनिराळ्या जातीचा जीवनक्रम पिढ्यानपिढ्या एका ठराविक चाकोरीत गुंतून पडला होता. राजकीय क्षेत्रात मोठ-मोठी स्थित्यंतरे झाली तरी ग्रामीण समाजाचे साचेबंद स्वरूप फारसे बदललेले नाही. ग्रामीण समाजातील लोक उदरनिर्वाहासाठी आपापल्या जातीचा व्यवसाय शतकानुशतके करीत राहिले. गावाच्या केंद्रस्थानी शेतकरी वर्ग असे. शेत जमीन त्यांच्या मालकीची असली तरी त्यांच्या

उत्पादनातील बराचसा भाग जमीन महसुलाच्या रूपाने शासनाकडे जाई. मात्र शासनाच्या रयतेशी प्रत्यक्ष संबंध क्वचितच येत असे. राजा आणि रयत यांना जोडणाऱ्या देशमुख- देशपांडे यांसारख्या वतनदारामार्फत जमीन महसुलाची वसुली केली जाई. "राज्यात चालविण्यास राजाला जो पैका व धान्यादी सामग्री पाहिजे ती ह्या देशमुख- देशपांडे वतनदारांकरवी मिळावयाची. देशमुख- देशपांडे यांच्या जोडीला राज्यसूत्र चालकांकडून सुभेदार नेमलेले असत, पण तेही देशमुख हे आपले काम बरोबर करतात न करतात हे पाहण्यासाठी असतात. म्हणजे त्यांनाही देशमुखादिकांचे कडून हे वसुलीचे काम करून घ्यावयाचे आहे; स्वातंत्र्याचे नाही"(१) असे 'मराठेकालीन समाज दर्शन' या ग्रंथात म्हटले आहे.

महसुलाच्या रूपाने राजाच्या खजिन्यात जमा होणारा पैसा बहुव्हंशी राजेरजवाड्यांच्या ख्यालीखुशालीत, फौजफाट्यात खर्च होत असे. परचक्र निवारण आणि शांततारक्षण एवढे साधारणपणे राज्याचे कर्तव्य मानले जाई. त्यामुळे सबंध मध्ययुगात सत्ताधाऱ्यांपैकी कोणीही शेती सुधारणा करणे, शेती उत्पन्न वाढवणे याकडे लक्ष दिले नाही. सारा राज्याचा व देशाचा अन्नदाता शेतकरी कराच्या ओझ्याखाली कशीबशी गुजरान करीत असे. राज्यसंस्था, जातीसंस्था आणि गावातील वरिष्ठ वतनदार, पाटील, कुलकर्णी हा विशेषाधिकारयुक्त वर्ग असलेली ग्रामसंस्था हे सारे शोषक असल्यामुळे ग्रामीण बहुजन समाज मध्ययुगात दयनीय अवस्थेत जगत होता. या व्यवस्थेविरुद्ध ग्रामीणांनी कधीच बंद केले नाही. याचे कारण त्यांचे परंपरागत चालत आलेले अज्ञान आणि आंधळी- धर्मश्रद्धा, कर्मविपाकसिद्धांत रोमारोमात भिनल्यामुळे ग्रामीण समाज दैववादी आणि अत्यंत सहनशील झालेला होता. या अशिक्षित श्रमजीवींच्या मनात व्यवस्थेची छाननी करण्याचा विचारही येणे शक्य नव्हते.

## आंग्लकाळ

19 व्या शतकात आंग्लं राजवट सुरू झाल्यावर कायद्याचे राज्य आले. शासनाने जमिनीची मोजणी करून रयतवारी पद्धत सुरू केली. भारतीय दंडसंहिता सिद्ध केली. जातीनुसार नव्हे तर गुन्ह्यानुसार शिक्षा दिली जाऊ लागली. सार्वत्रिक शिक्षण सुरू केले. तरी आपल्या हितसंबंधाचा विचार करून आंग्लं शासनाने इतल्या धर्मात हस्तक्षेप करण्याबाबत उत्साह दाखवला नाही. तसेच खेड्यापाड्यातील बहुजनांच्या शिक्षणाबाबत पुढाकार घेतला नाही. उच्चवर्णीयांना शिक्षण दिले तर ते त्यांच्यामार्फत खालपर्यंत झिरपत जाईल अशी समजूत करून घेऊन राज्यकर्त्यांनी ग्रामीणांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले. थोडक्यात, शहरी उच्चवर्णीच्या जीवनात नव्या राजवटीत जसे बदल झाले तसे ग्रामीण समाजाबाबत घडले नाही.

## स्वातंत्र्योत्तर काळ

स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करताना महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला. त्यांच्या या आवाहनामुळे खरा भारत खेड्यात वसला आहे ही जाणीव निर्माण झाली. काँग्रेस पक्षाने आपल्या ध्येयधोरणात खेड्यांचे प्रश्न समाविष्ट केले. स्वातंत्र्यानंतर 1950 मध्ये राज्यघटना तयार झाली. पंचवार्षिक योजनांची आखणी, मोठी धरणे, कृषी विकासाच्या योजना आणि स्थानिक स्वराज्य संस्था हे उपक्रम सुरू झाले. 1962 साली जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यामुळे खेड्यापाड्यांतून राज्यसत्ता प्राप्तीची आकांक्षा निर्माण झाली. सहकार चळवळ, पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने, भूविकास बँका, दूध सोसायट्या, यांचा खेड्याच्या अर्थकारणावर परिणाम झाला. साक्षरता प्रसार व प्रौढ शिक्षण योजना ग्रामीण भागात राबवल्या जाऊ लागल्या. इंदिरा गांधीच्या काळात ग्रामविकास हे राजकीय धोरण ठरले. लेव्ही बंधनकारक झाली. 1960 नंतरच्या छोट्या धरण योजना, सिंचन योजना, रोजगार हमी योजना, पाणी योजना, आवास योजना राबण्यात येऊ लागल्या. ट्रॅक्टर आले, मोटेऐवजी विहिरीवर इंजन व मोटर आली, दळणवळणाची साधने वाढली, प्रसारमाध्यमे खेड्यापर्यंत पोहोचू

लागले, शिक्षण प्रसारामुळे शेतकऱ्यांची शिकलेली मुले नोकरीसाठी शहरात गेली. त्यांचा शेतीशी असलेल्या संबंध तुटला. 1960 नंतर शेतकऱ्यांची मुले राजकारणात नेतृत्व करू लागले. त्यांचीच मुले साखर कारखाने, शिक्षण संस्था, सहकारी सोसायट्या अशा सत्ताकेंद्रात आली. थोडक्यात ग्रामीण भागात एक तालेवारांचा वर्ग निर्माण झाला. त्यात बडेबागाईतदार, साखर कारखानदार, व्यापारी, दलाल, भ्रष्ट अधिकारी या साऱ्यांचा समावेश झाला. मध्ययुगातले वतनदार गेले आणि नवे वतनदार आले. छोटा शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, जुनी बलुतेदारी लुप्त झाल्यामुळे शहराकडे स्थलांतर करून भणंगपणे जगणारे जुने व्यावसायिक या साऱ्यांची स्थिती सोचनीय झाली. सरकारी उत्तम- उत्तम योजना खेड्यातील गरिबांसाठी असल्या तरी रुपयातले दहा- पंधरा पैसे त्यांच्यापर्यंत जेमतेम पोहोचतात हे आपले पूर्व पंतप्रधान राजीव गांधी यांनी म्हटले होते. त्यात 1990 नंतर जागतिकीकरण व खुले आर्थिक धोरण भारत सरकारला जागतिक दबावामुळे व बिघडलेल्या आर्थिक स्थितीमुळे स्वीकारावे लागले. हे जागतिकीकरण म्हणजे प्रत्यक्षात पाश्चात्य कंपन्यांना, उत्पादकांना अविकसित व विकसनशील देशात स्वैरसंचाराला व आपली उत्पादने विकण्याला परवाना मिळणे! त्याचे परिणाम आता 35 वर्षानंतर उग्ररूपात ग्रामीण भागातही दिसू लागलेले आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांची महागडी खते, बियाणे, कीटक-नाशके घेण्याला आता पर्याय उरला नाही. त्यातही लबाडी, फसव्या- फसवी योजना यामुळे शेतकऱ्यांचे आणखी नुकसान होत आहे. बेभरोशाचा पाऊस, शेतकऱ्यांच्या तोंडाचा घास हिरावून घेत आहे. शेती टाकता येत नाही, या गावावरून त्या गावातून पोत्यात भरून नेता येत नाही आणि शेती करताही येत नाही अशी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झालेली आहे. शेतकरी शेतमजुरांची शिकलेली बेरोजगार तरुण मुले-मुली वनवन फिरत आहेत. कर्जबाजारी शेतकऱ्यांची प्रवृत्ती आत्महत्येकडे वाढते आहे. त्या सर्वांना चाप लावण्याची इच्छाशक्ती सरकारजवळ दिसत नाही. पाण्याची टंचाई, भारनियमन, बँकांचे आडमुठे धोरण, धरणाचे पाणी कालव्यांच्याद्वारे शेतापर्यंत पोहोचण्याबाबत तडप दाखवण्याऐवजी उद्योगांना आणि उत्पादनाला वीज पुरवण्याचे धोरण आखले गेले आहे. शिक्षण सम्राटांच्या स्वार्थापायी ग्रामीण शिक्षणाचा दर्जा अत्यंत खालावलेला आहे. आरोग्याची परवड होत आहे, टँकरने पाणीपुरवठा, जलसंधारणाबाबत वेगवान उपायांचा अभाव या साऱ्यांमुळे ग्रामीण भाग उजाड, उध्वस्त आणि कळाहीन होऊन बसला आहे.

शेतकऱ्यांचे दिवसेंदिवस आपसातले तंटेबखेडे शेतीच्या वाटण्या, शेतकऱ्यांच्या शिक्षित मुलांना शेतीत रस नसणे, ढासळती एकत्र कुटुंब पद्धती, सरकारच्या स्वस्त धान्य पुरवण्याचे योजनांमुळे शेतमजुरांमध्ये संचारलेला आळस, राजकारणात वाढती जातीयता, भ्रष्ट अधिकारी आणि वाढता भ्रष्टाचार अशा स्वतःच्या दोषांनी ग्रामीण समाज आपले नुकसान करून घेत आहे. या ग्रामीण वास्तवाचे सर्वांगीण चित्रण 1990 नंतरच्या कथा, कविता, कादंबरी या साहित्य प्रकारात आजची ग्रामीण लेखकाची नवी पिढी करीत आहे. शेतकरी संघटना-चळवळ, शेतमालाला भाव मिळावा यासाठी होत असलेली आंदोलने, ग्रामीण साहित्याची चळवळ, ग्रामीण साहित्य संमेलने, चर्चासत्रे, परिसंवाद यातून ग्रामीण लेखकांना दिशा लाभते आहे. तसेच साहित्याच्या कलात्मकतेचे महत्वही त्यांना जाणवत आहे.

## साहित्य आणि समाज

साहित्य आणि समाज यांचा अतूट संबंध असताना देशातला सर्वात मोठ्या लोकसंख्येचा ग्रामीण समाज आधुनिक वाङ्मयाचा दीर्घकाळापर्यंत विषयच होऊ शकला नाही. याचे कारण सगळे साहित्य व्यवहार (त्यात लेखक, वाचक, प्रकाशक, समीक्षक सारेच आले)- सुशिक्षित शहरी मध्यमवर्ग यांच्या हाती एकवटलेला होता. एकोणिसाव्या शतकात महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' मधून व इतर लेखनातून ग्रामीण समाजावरील अन्यायांना वाचा फोडली होती. शोषक कोण आहेत ते स्पष्ट सांगितले होते. शेतकऱ्याच्या समस्या मांडल्या होत्या, त्यावर उपाय सुचविले होते व सरकारनेही त्याबाबत पुढाकार घेण्याचा

आग्रह धरला होता. परंतु त्याच काळातले इतर बहुतेक विचारवंत मध्यमवर्गीय स्त्री- सुधारण्याच्या रिंगणातच फिरत राहिले. फुल्यांचे महत्त्व समाजाला फार उशिरा म्हणजे विसाव्या शतकात समजले. आज ग्रामीण साहित्य महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा अभिमानाने सांगते आहे.

## स्वातंत्र्यपूर्व ग्रामीण साहित्य

स्वातंत्र्यपूर्व काळात वि.वा. हडप, र.वा. दिघे, दत्त रघुनाथ कवठेकर, ग. ल, ठोकळ, ग.ह. पाटील, यांसारख्या लेखकाने ग्रामीण जीवनावर कथा, कादंबऱ्या, कविता लिहिल्या. परंतु ग्रामीण जीवनाच्या निकट परिचयाअभावी तसेच रंजनमूल्यांच्या प्रभावामुळे त्यांच्या कादंबऱ्यातले शेतकऱ्यांच्या जीवनाचे आणि ग्रामीण वास्तवाचे चित्रण धुसर आणि अंधुक राहिले. पुढे नवकवितेचे एक प्रवर्तक व्यंकटेश माडगूळकर यांनी 'मानदेशी माणसे' व पुढे 'बनगरवाडी' यातून मानदेशचा उजाड परिसर व तिथल्या ग्रामीण माणसाची अस्सल जीवन चित्रीत केले. ग. दि. माडगूळकरांचा प्रभाव त्यांच्या नंतरच्या सर्व लेखकांवर पडलेल्या दिसून येतो.

## 1960 नंतरची ग्रामीण साहित्य चळवळ व ग्रामीण साहित्य

1960 नंतर मराठी साहित्यात जे वेगवेगळे प्रवाह अवतरले त्यातला एक महत्त्वाचा प्रवाह ग्रामीण साहित्याचा होता. वास्तववाद हा या साहित्याचा परवलीचा शब्द होता. 1970 नंतर सुरू झालेल्या ग्रामीण साहित्यात चळवळीने लेखक-वाचकांना ग्रामीण संवेदन आणि अभिरुची याबाबत मार्गदर्शन केले. आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, द. ता. भोसले, वासुदेव मुलाटे, रा.रं. बोराडे, भास्कर चंदनशिव इत्यादींनी स्वतः ग्रामीण साहित्याची निर्मिती तर केलीच शिवाय ग्रामीण साहित्याच्या आवश्यकतेचे सिद्धांतन केले. इतकेच नव्हेतर त्यांनी 1980 च्या दशकातील शेतीतील व खेड्यातील भौतिक मानसिक परिवर्तनाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. या चळवळीची वैचारिक भूमिका सांगताना डॉ. आनंद यादव म्हणतात --

"या चळवळीने महात्मा ज्योतिबा फुले, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, सुधारककर्ते आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, विज्ञाननिष्ठ व समाज प्रवर्तक वि. दा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, तसेच समाजवादी विचार प्रवाह, सर्वोदयवादी विचार प्रवाह आणि महर्षी धोंडो केशव कर्वे, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बहुजन समाजाविषयी कार्याची दिशा इत्यादींमधील अनेक विचार घटक आत्मसात करून तिने आपला विचारव्यूह आकाराला आणलेला आहे"(२) त्यांच्याशी सहमती दर्शवीत "संमिश्र वैचारिकतेची समरसता अनुभवात ग्रामीण साहित्य चळवळ गतिमान राहिलेली आहे" (३) असे डॉ. एकनाथ पगारही म्हणतात.

या सुमारास शरद पाटील यांनी 'अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र'प्रमाणित करण्याचा प्रयत्न केला; तर शरद जोशी यांनी इंडिया व भारत अशी विभागणी करून खरा भारत म्हणजे खेड्यातला शेतकरी, काम करणाऱ्या गरिबांचा भारत तर 'इंडिया' म्हणजे शेतकऱ्यांचे शोषण करणारा व्यापारी आणि शहरी लोकांचा दिखाऊ 'भारत' अशी मांडणी केली आहे. भारताची कृषीप्रधानता, खेड्यातील मोठी लोकसंख्या, खेड्यांची अन्नपूर्णा शेती अशा बाबी विचारात घेऊन खेड्यांना प्रमाण मानावे आणि मराठी माणसाचा आणि मानसिकतेचा शोध खेड्यातूनच घेतला जावा ही ग्रामीण साहित्याच्या समर्थकांची धारणा दिसते.

ग्रामीण भागातला जन्म, ग्रामीण कष्टकऱ्यांच्या जीवनाचा अस्सल अनुभव, ग्रामीण साहित्याच्या चळवळीतून मिळालेले मार्गदर्शन आणि या लेखांच्या पूर्वार्धात उल्लेख दिलेल्या जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था या नव्या शासकीय धोरणांचे

समाजात दिसू लागलेले परिणाम या साऱ्यांच्या रसायनातून शिक्षित ग्रामीण लेखकांच्या पुढच्या पिढीचे 1990 नंतरचे कथा, कादंबरी व कविता या वाङ्मय प्रकारातले लेखन सिद्ध झालेले आहेत.

### 1990 नंतरची ग्रामीण कादंबरी व ग्रामीण समाज:-

1990 नंतरच्या आधी लिहिणारे लेखकही त्यात समाविष्ट आहेत. रा.रं. बोराडे, विश्वास पाटील, बाबाराव मुसळे, राजन गवस, भीमराव वाघचौरे, गणेश आवटे या प्रथितयश लेखकांच्या 1990 नंतर अनेक कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत.'पाचोळा' पासून ग्रामीण प्रश्नांना भिडणाऱ्या रा.रं.बोराडेंनी 'महानगाव'- (1993), 'रहाटपाळणा'- (1996),'इथं होतं एक गाव'- (2000),'मरणदारी'- (2004),'आमदार श्रीमती'-(2007) आणि 'रिक्त अतिरिक्त' (2009 या कादंबऱ्यामधूनही ग्रामीण समस्यांचा शोध घेतला आहे. किल्लारीचा भूकंप, भूकंपजन्य परिस्थिती हाताळणारे प्रशासन, त्यातले राजकारण, उसाचे प्रश्न, साखर उद्योगातले राजकारण, त्यात गरीब शेतकऱ्यांची झालेली वाताहत असे अनेक ज्वलंत ग्रामीण प्रश्न ते पात्र प्रसंगातून अधोरेखित करतात.

बाबुराव मुसळे यांनी 'पखाल' (1995), 'वारूळ'(2004) आणि 'पाटीलकी'(2007) या कादंबरातून बदलत्या ग्रामीण परिस्थितीत जुन्या बलुतेदारांची कशी वाताहत झाली ते दाखवले आहे. सदानंद देशमुख हे 1991 नंतरचे एक महत्त्वाचे कादंबरीकार. 'बारोमास' या कादंबरी मधून कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला शेवटी आत्महत्या शिवाय पर्याय उरत नाही हे 'बारोमास' मध्ये एका शेतकरी कुटुंबाच्या संदर्भात ते दाखवतात; तर 'तहान' मध्ये पाणी मूलभूत गरज आणि ग्रामीण भागात अत्यंत बिकट झालेल्या पाण्याचा प्रश्न त्यातल्या गुंतागुंतीसह ते मांडतात. शेषराव मोहिते, सतीश जाधव, शंकर सखाराम, भारत काळे, रमेश इंगळे उत्रादकर, कृष्णात खोत, हे आणखीन काही नवे कादंबरीकार 1991 नंतरच्या देशाच्या आर्थिक धोरणातून निर्माण झालेल्या नव्या प्रश्नांना भिडलेले आहेत. त्यात लहरी पाऊस, शैक्षणिक धोरण, सेझ, कीड, नापिकी, रोगराई, महागाई अशा अनेक गोष्टींचे चित्रण येते. हे सर्व लेखक गंभीरवृत्तीचे आहेत आणि जागरूकपणे लिहिताना दिसतात. दाहक वास्तवाला ते सामोरे जातात. त्यात कोणतेही रोमँटिक रंग ते मिसळत नाहीत.

### 1990 नंतरची ग्रामीण कथा व ग्रामीण समाज

1990 नंतर अंतर्बाह्य ढवळून निघालेले ग्रामीण जीवन त्यातल्या साऱ्या गुंतागुंतीसह 1990 नंतरच्या ग्रामीण कथेतूनही व्यक्त झाले आहे. शेतकरी, शेतमजूर या कष्टकऱ्यांची दुःखे ग्रामीण कथाकारांनी केंद्रस्थानी ठेवली आहे. नव्या कथाकारांच्या मनाची मशागत शिक्षण, स्वानुभव ग्रामीण साहित्य चळवळ या साऱ्यांतून झालेली आहे. ग्राम जीवनाचे अनेक पदर उलघडणाऱ्या ग्रामीण कथेत विषयांची विविधता आढळते. 1990 नंतर प्रारंभ रा. रं,बोराडे, भास्कर चंदनशिव, शंकर बडे, श्रीराम गुंदेकर, सदानंद देशमुख, बाबाराव मुसळे, नागनाथ कोत्तापल्ले, आसाराम लोमटे, उत्तम बावस्कर, इत्यादी कथा लेखकांचे ग्रामीण कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. यातले अनेक लेखक यशस्वी कादंबरीकारही झाले आहेत. या लेखकाच्या कथांमधून खेड्यातल्या जीवनातले ताणतणाव, कोंडमारा, दमछाक, अज्ञान, दारिद्र्य, अन्याय, अत्याचार, अगतिकता व व्यथा इत्यादींचे चित्रण झालेले आहे. अनुराधा गुरव, प्रतिमा इंगोले, मधू सावंत यासारख्या लेखिकाही आहेत. ग्रामीण कथा, कादंबरी लेखनामध्ये लेखिका थोड्या असल्यातरी त्यांनी ग्रामीण स्त्रीच्या जीवनाचा व त्यांच्या व्यथा वेदनांचा प्रामाणिकपणे वेध घेतलेला आहे. अशाप्रकारे विदर्भ, मराठवाडा, कोकण अशा विविध मागास भागातून लेखक ग्रामीण कथा लिहित आहेत. त्यांच्या कथांना

स्वानुभवाचे दान मिळालेले आहे. बदलत्या ग्रामीण समाजाचे व्यामिश्र वास्तव त्यांनी कथा, कादंबऱ्यातून समर्थपणे व्यक्त करता आले आहे.

## 1990 नंतरची ग्रामीण कविता व ग्रामीण समाज

1990 नंतर ग्रामीण कविता विपुल संख्येने लिहिली गेली आहे. या कवितेतून ग्रामीण संवेदन उत्कटपणे व्यक्त झालेली आहे. ग्रामीण भागाची निसर्गाशी नाळ सदोदित जोडलेली आहे. ग्रामीण परिसरातला निसर्ग, लोकजीवन यांचे साहजिकच ग्रामीण कवितेतून अविष्कारण होते. परंतु 1991 नंतरच्या कवींना शेतकऱ्यांचे अभावग्रस्त जीवन सर्वात जास्त महत्त्वाचे वाटले आहे व ते त्यांनी व्यक्त केले आहे. या कवीच्या प्रतिभेला महाविद्यालयीन शिक्षण ग्रामीण साहित्य चळवळ यातून खतपाणी मिळालेले आहे आणि त्यांना आत्मभानही आलेले आहे. 1991 नंतर जगदीश कदम, प्रकाश होळकर, बालाजी इंगोले, नारायण सुमंत, अशोक कोळी, प्रमोद माने, दिलीप पाटील, नरेश मोरे, सुनंदा पाटील, स्मिता शानबाग, श्रीराम गव्हाणे इत्यादी कवी-कवयित्रींची मोठीच मांदियाळी समोर येते. या साऱ्यांनीच ग्रामीण वास्तव अनेक अंगाने प्रभावीपणे मांडलेले आहे. इंद्रजीत भालेराव हे या कवींमधील एक महत्त्वाचे कवी होत. शेतकऱ्यांची दैना समाजाची शेतकऱ्यांविषयी अनास्था, कृतघ्नता हे सर्व त्यांना तीव्रपणे जाणवते व ते आपल्या भावनांची प्रभावी अभिव्यक्ती साधताना म्हणतात-

"सांग माझ्या बापानं नाही केला पेरा,
तर तुम्ही काय खाल ? धत्तुरा"

या त्यांच्या बिनतोड प्रश्नावर एका वाक्याचेही भाष्य करणे आवश्यक ठरत नाही. कुणब्याची पोरं शिकतात, नंतर नोकरीसाठी वणवणत राहतात.वरील कवींनी वर्तमान जीवनातील नवी भाषा व प्रतिमा आत्मसात केलेले आहे. त्यातून ते बदलत्या वास्तवाचा, कधी चिडून, कधी अगतिकतीने तर कधी उपरोध, उपहासाने वेध घेत आहेत.

## समारोप

1990 नंतरच्या ग्रामीण साहित्यातून बदलत्या ग्रामीण समाजाचे प्रतिबिंब उमटलेले आहे. बहुतेक लेखक ग्रामीण परिसरातून आलेले आहेत. त्यांची भूमिका वास्तववादाची आहे. ग्रामीण प्रश्नाचे त्यांना पुरेशी आकलन झालेले आहे. त्यासाठी शेतकरी संघटना, शेतकऱ्यांची आंदोलने त्यांना जाणीव जागृतीच्यादृष्टीने सहाय्यभूत ठरली आहेत. ग्रामीण साहित्य चळवळीतून साहित्यातील आशय आणि अभिव्यक्तीबाबत त्यांना योग्य मार्गदर्शन लाभले आहे. आपापल्या पिंड धर्मानुसार ते प्रामाणिकपणे कथा, कविता व कादंबऱ्यातून ग्रामीण वास्तवाचे दर्शन घडवीत आहेत. कवितेतून आत्मविष्कार साधत आहेत. ग्रामीण समाजाचा भौगोलिक विस्तार व लोकसंख्या या आधारावर आणि ग्रामीण साहित्याचे भरघोस पिक बघता हेच साहित्य मध्यवर्ती साहित्य मानले जावे असे वाटते. डॉ. अरविंदवामन कुलकर्णी यासंबंधी म्हणतात- "काळीचे साहित्य खरे प्रतिनिधिक म्हणू असे मराठी साहित्य असेल; पांढरीचे नवे !"(४) असे जे विधान केले आहे ते मान्य होण्यासारखे आहे.

त्याचवेळी एक गोष्ट मनाला खटकते ती नमूद करायला हवी. साहित्यात वास्तवाचे नुसते प्रतिबिंबउमटणे पुरेशी नसते. श्रेष्ठ लेखकांची प्रतिभा भविष्यात डोकावू शकते. ते क्रांतीदृष्टीचे लेखक असतात. परिस्थिती जनहितैशी अनुकूल बदल घडवण्यासाठी समाजशास्त्र आदि ज्ञानशाखांचे परिशिलन त्यांनी केलेले असते. त्यातून नव्या समाजाची स्वप्ने ते पाहतात. अशी

स्वप्ने आज फँटशीसारखी वाटली तरी ती साहित्यातून रंगवायला हरकत नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मध्य प्रांत-वऱ्हाडाच्या काही जिल्ह्यात असा भरीव प्रयत्न केला होता. ग्रामीण साहित्याचे वास्तव वेध घेतानाच त्यापलीकडच्या सुसंवादपूर्ण ग्रामीण विश्वाचे चित्र जे आज काल्पनिक असेल पण उद्या प्रत्यक्षात उतरेल असे कथा- कादंबऱ्यात मूर्त करून दाखवायला हरकत नाही. किमान ग्रामीण भागात चाललेली विधायक कामे, ग्रामीण जनतेने आपल्या मागण्यांसाठी केलेली यशस्वी आंदोलने, भ्रष्टाचाराशी एकजुटीने दिलेला यशस्वी लढा अशी चित्रणेही लेखकाने केली तर ती ग्रामीण समाजाला हुरूप देतील; आशावादी दृष्टिकोन रुजू शकतील, शिवाय अशी कथानके सर्वस्वी काल्पनिक म्हणता येणार नाहीत कारण आपल्या आजूबाजूला असे काही प्रयत्न चाललेले आपण पाहतोच. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी जवळच्या 'चोरटी'गावाचा संघर्ष ग्रामविकासाच्यादृष्टीने संजीवनी ठरला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील 'लेखामेंढा'परिसरातील आदिवासींनी आंदोलन करून शासनाकडून बांबू तोडीचे अधिकार मिळवले व त्यानुसार तेथील ग्रामसभेने बांबूतोड व त्याची विक्री ही कामे स्वायत्तपणे करून एक कोटीच्यावर नफा कमवला व हा पैसा ग्रामविकासाच्या कामासाठी वापरला आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व गीताचार्य तुकारामदादा यांची प्रेरणा घेऊन प्रत्यक्षात साकारलेले अगदी अलीकडची ग्रामीण जनशक्तीची दर्शक अशी ही उदाहरणे आपल्यासमोर आहेत.

## संदर्भ ग्रंथ

(१)'मराठेकालीन समाजदर्शन' संपा-शं.ना. जोशी, पृष्ठ क्र. 54.

(२) 'आनंद यादव- ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही' संपा- वासुदेव मुलाटे, पृष्ठ क्र. 56.

(३) 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड सातवा 1950 ते 2000 भाग-2, संपा - प्रा. रा.ग. जाधव, प्रथमावृत्ती, जानेवारी 2011, प्रकाशक- महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे. पृष्ठ क्र. 449.

(४) तत्रेव, पृष्ठ क्र. 450.